**CNR NO-MHSO060013272023**

विशेष दिवाणी दावा क्र. २८५/२०२३
दादा गेळे व इतर.
वि.
चंद्रकांत होनमाने व इतर.

## नि. क्र. २१ वरील आदेश
## (घोषित दि. ०६/११/२०२३)

०१] प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांचेतर्फे दाखल करण्यात आलेला असून कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापीत करुन दाखल करण्यात आलेली कैफियत स्वीकारण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०२] वादीतर्फे सदर अर्जास प्रखर विरोध करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०३] प्रतिवादी क्र.१ व २ यांनी विहित मुदतीत म्हणजेच दि.३१/१०/२०२३ रोजीपर्यंत आपली कैफियत सादर केलेली नाही. प्रतिवादींनी कैफियत दाखल करण्यास ५ दिवसांचा विलंब झालेला आहे. दि.३०/१०/२०२३ रोजी प्रतिवादींतर्फे दाखल करण्यात आलेला मुदतीचा अर्ज नि.क्र.२० अंतिम संधी म्हणून मंजूर करण्यात आला व दावा कैफियतीकरीता आजरोजी ठेवण्यात आला. प्रतिवादीतर्फे आजरोजी आपली कैफियत दाखल करुन झालेल्या विलंबाकरीता प्रस्तुतचा अर्ज सादर केलेला आहे. एकुणच प्रतिवादींनी जाणिवपुर्वक विलंब केला असे म्हणण्यास कोणताही वाव नाही. अश्या परिस्थीतीत झालेला विलंब क्षमापीत करुन दाखल करण्यात आलेली कैफियत पटलावर घेणे न्यायोचित असल्याचे माझे मत झालेले आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

प्रतिवादी क्र. १ व २ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापीत करुन त्यांनी दाखल केलेली कैफियत पटलावर घेण्यात येते.

सही/-

**दि.०६/११/२०२३.**

**(अमित अ.खंडाळे)**
**सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, पंढरपूर.**

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 06.11.2023 |
| Judgment/order signed by | : | |
| the Presiding Officer on | : | 06.11.2023 |
| Judgment/Order uploaded on | : | 06.11.2023 |